॥ सा विद्या या विमुक्तये ॥

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED

"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)

Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

**Director, Board of Examinations & Evaluation**

**Phone: (02462) 229294**
**Fax : (02462) 229520**

**Website: www.srtmun.ac.in**

**E-mail : srtmuncoe@gmail.com**
**srtmundboee@gmail.com**


संदर्भ : परीक्षा/समन्वय/२०२०—२०२१/३९९ दिनांक: २३.०९.२०२०

# तातडीचे परीपत्रक

प्रति,
प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालय, प्रस्तुत विद्यापीठ,
संचालक, सर्व संकुल, प्रस्तुत विद्यापीठ, नांदेड
संचालक, उपकेंद्र, प्रस्तुत विद्यापीठ, लातूर
संचालक, उपकेंद्र, प्रस्तुत विद्यापीठ, परभणी
प्राचार्य, न्यु.मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली

**विषय: पदवी व पद्व्युत्तर अभ्यासक्रमाच्या उन्हाळी—२०२० मॉक टेस्ट (अभिरुप) परीक्षा व संगणक (IT) समन्वयक नेमणे बाबत.**
**संदर्भ : या कार्यालयाचे परीपत्रक क्र.परीक्षा/समन्वयक/२०२०—२१/३२७, दि.०८/०९/२०२०**

महोदय,

वरील संदर्भीय परीपत्रकान्वये आपणास कळविण्यात येते की, प्रस्तुत विद्यापीठाच्या सर्व पदवी व पद्व्युत्तर अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षाच्या अंतिम सत्रातील नियमीत व अंतीम सत्रातील ज्या विद्यार्थ्यांचे मागील सत्राचे काही विषय अनुतीर्ण असतील तर या सर्व विषयांची उन्हाळी—२०२० परीक्षा हया माहे ऑक्टोबर — २०२० मध्ये घेण्यात येणार आहेत. त्यासाठी परीक्षा ऑनलाईन व ऑफलाईन पध्दतीने घेण्यात येणार आहेत. त्याबाबतीत सविस्तर संदर्भीय पत्रात नमूद करण्यात आलेले आहे.

तेंव्हा कला, वाणिज्य व विज्ञान पदवी अभ्यासक्रमाच्या परीक्षा Online पध्दतीने परीक्षा देणा—या विद्यार्थ्यांच्या मॉक टेस्ट (अभिरुप परीक्षा) **दिनांक २८ ते ३० सप्टेंबर, २०२० दरम्यान** घेण्यात येणार आहेत.

तसेच सदरील ऑनलाईन परीक्षा सुरळीत पध्दतीने पारपाडण्यासाठी महाविद्यालयीन स्तरावर दोन समन्वयकांची **(IT Co-ordinator)** (संगणकाचे परीपूर्ण ज्ञान असलेले प्राध्यापक / शिक्षकेतर कर्मचारी) नेमणूक करण्यात यावी जेणे करुन आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची ऑनलाईन परीक्षेची तांत्रिक अडचण सोडविणेसाठी सोईचे होईल.

**तसेच पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षार्थ्यांच्या मॉक टेस्ट दिनांक ०१ ऑक्टोबर ते ०५ ऑक्टोबर २०२० दरम्यान घेण्यात येणार आहेत**.

तसेच पदव्युत्तर व व्यावसाईक सर्व अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांची मॉक टेस्ट (अभिरुप परीक्षा) **ऑक्टोबर, २०२० च्या पहिल्या आठवडयात** घेण्यात येतील.

सबब, आपल्या महाविद्यालयातील संगणकांचे ज्ञान असलेले शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचा—यांची नांवे https://forms.gle/gL6N3kbGYHMNEJo8A या **लिंकवर दिनांक २५ सप्टेंबर २०२०** पर्यंत पाठविण्यात यावीत. तसेच सदर **(IT Co-ordinator)** समन्वयकांचे ऑनलाईन प्रशिक्षण **दिनांक २६ सप्टेंबर २०२० रोजी घेण्यात येणार आहे. त्यांचे वेळापत्रक संबंधिताच्या whatsapp द्वारे** कळविण्यात येईल.

स्वा—
**संचालक,**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

**प्रत माहितीस्तव:**
१. मा. कुलगुरू महोदय, प्रस्तुत विद्यापीठ.
२. मा. प्र—कुलगुरू महोदय, प्रस्तुत विद्यापीठ
३. मा. कुलसचिव, प्रस्तुत विद्यापीठ.
४. सर्व अधिकारी/अधिक्षक/सहा. अधिक्षक, परीक्षा विभाग, प्रस्तुत विद्यापीठ